सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ७८ | मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



सुनिल आर. शिंपी

मा. प्रदेश संघटक, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस

# रासायनिक खतांच्या किमती वाढल्याने शेतकरी चिंतित

## रब्बी हंगामात खिशाला कात्री; आर्थिक नियोजन कोलमडले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर- तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यात आता रासायनिक खतांच्या किमती १५० ते २०० रुपये प्रतिबॅग वाढल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अजून आर्थिक संकट उभे ठाकले आहे. गेल्या वर्षभरात सर्वच मालाचे भाव स्थिर होते. पेरणीलाही उशीर झाल्यामुळे शेतकरी संकटात होते. अवकाळी पावसानेही हातातोंडाचा घास आधीच हिरावला आहे. आता खतांच्या किमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांना शेती करावी कशी? असा प्रश्न भेडसावू लागला आहे. रब्बी हंगामात आता खर्चाचा जादा भुर्दंड सोसावा लागणार असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे.

अमळनेर तालुक्यात व परिसरात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, मका, कापूस, खरिपाची पिके वाया गेली. याचा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. अनेकांचे आर्थिक नुकसान झाले.

वेळेवर रब्बीची पेरणी करण्यासाठीही मोठी तारांबळ उडाली. दरवर्षी कोणत्या न कोणत्या नैसर्गिक आपत्तीला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे खर्च अधिक आणि उत्पादन कमी अशी स्थिती निर्माण होत आहे. कर्जाचा बोजा वाढत असल्याने शेतकरी अधिकच कर्जबाजारी होत आहे. अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला. रब्बीत तरी चांगले उत्पादन येईल, या आशेने शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे. खते, बियाणे व कीटकनाशक औषधांच्या किमती आधीच वाढलेल्या आहेत. मात्र, आता परत खतांच्या वाढलेल्या किंमतीने शेतकरी धास्तावले आहेत.

### शेतमालाला हमीभाव नाही

एकीकडे खते, बियाणे व औषधांच्या किमती भरमसाठ वाढत आहे. दुसरीकडे शेतमालाचे भाव कमी होत आहेत. शासनाने मालाला हमीभाव जाहीर केला असला, तरी सध्या बाजारात तसा भाव मिळत नाही. शेतीचा खर्च वाढत असताना उत्पादन मात्र त्या मानाने मिळत नाही. दरवर्षी, खरीप व रब्बी हंगामात मिश्र व रासायनिक खतांना मोठी मागणी असते. दरवर्षी खतांची मागणी वाढतच आहे. ही बाब लक्षात घेऊन खत कंपन्यांनी खतांच्या किमती भरमसाठ वाढविल्या आहेत.



“ शेतात रासायनिक खते टाकल्याशिवाय उत्पन्न मिळत नाही. रासायनिक खते व कीटकनाशक यांचे दर दिवसेंदिवस वाढतच आहे. दुसरीकडे शेतकऱ्याचा मालाचा भाव हा घटतच आहे. यंदाचा खतांचा भाव व कापसाला मिळालेला भाव पाहता ताळमेळ बसलेला नाही. पीक कर्ज, हात उसनवारीचे कर्ज कसे फेडावे? ही चिंता आहे.

– **वसंत पाटील,** शेतकरी, शिरूड.

## दिनविशेष

०९ डिसेंबर

- थोरले माधवराव पेशव्यांनी रमाबाईशी लग्न केले
- स्वामी विवेकानंद अमेरिकेतील सर्व धर्म परिषदेत भाग घेऊन मुंबईत भारतात परतले.
- संविधान सभेची पहिली बैठक दिल्लीत झाली.
- दीव आणि दमण हे पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेश भारतात समाविष्ट करण्यात आले.
- बारामती-पुणे थेट रेल्वेचे उद्घाटन झाले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# मांडळ येथील अवैध वाळू वाहतूकप्रकरणी तीन आरोपी जेरबंद!

## पोलिसांचे यश; न्यायालयाने सुनावली पाच दिवस पोलीस कोठडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील मांडळ येथे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईसाठी गेलेल्या पथकातील मंडळ अधिकाऱ्याच्या डोक्यावर पिस्तूल लावून वाळूमाफियांनी जीवे मारण्याची धमकी दिली होती. ही घटना शनिवार, दि. ७ डिसेंबर रोजी रात्री एक वाजेच्या सुमारास घडली होती. याप्रकरणी मंडळ अधिकारी पुरुषोत्तम पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मारवड पोलीस ठाण्यात सुमारे २१ जणांवर गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर पोलिसांनी सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी तीन आरोपींना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.




घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक विनायक कोते यांनी घटनास्थळी भेट दिली होती. विविध भागात पथक रवाना करण्यात आले होते. आरोपींचा शोध घेऊन घटनास्थळी असलेले ट्रॅक्टर व जेसीबी मशिन ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मारवड येथील सहायक पोलीस निरीक्षक जिभाऊ पाटील, पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक संजय पाटील, सहायक फौजदार फिरोज बागवान, पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय पाटील व जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल हरीलाल पाटील, प्रवीण मांडाळे, संदीप पाटील, राहुल कोळी यांच्या पथकाने सागर अशोक कोळी, विकास पाटील व किरण कोळी या तीन आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली आहे. दोन ट्रॅक्टर मारवड पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहे. तिन्ही आरोपींना सोमवार, दि. ८ रोजी न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार तपास करीत आहेत.

# महाराष्ट्र मंदिर महासंघातर्फे गुरुवारी राज्यव्यापी अभियान

## मुद्रांक , नोंदणी शुल्क माफीबाबत लोकप्रतिनिधी, प्रशासनास देणार निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळेर- राज्यातील मंदिरांना दानरूपाने मिळणाऱ्या आणि मंदिरांनी खरेदी केलेल्या जमिनींवरील मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करावे, यासाठी संपूर्ण राज्यभर गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी एकाच दिवशी महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि मंदिर विश्वस्त यांच्यातर्फे अभियान राबविण्यात येणार आहे. यावेळी विविध मंदिर विश्वस्तांतर्फे लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे. याबाबत मंदिर महासंघातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

**अभियानाचे स्वरूप**

जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार यासह स्थानिक आमदार, पालकमंत्री यांना महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने तसेच प्रत्येक मंदिराच्या वतीने (मंदिरांनी स्वतःच्या लेटरहेडवर) निवेदन देणे. ज्या मंदिरांकडे मंदिराचे लेटरहेड नाहीत अथवा मंदिराच्या लेटरहेड वर निवेदन तयार करणे शक्य नाही, अशा मंदिरांना निवेदने तयार करण्यासाठी संगणकीय सहाय्य उपलब्ध करून द्यावे. यासाठी जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर एकाकडे अथवा दोघांकडे दायित्व देऊ शकता येईल. सर्व मंदिरांच्या लेटरहेडवरील निवेदने बुधवार, दि. १० डिसेंबरपर्यंत आपल्याकडे जमा करून ठेवावी. जेणेकरून मोठ्या संख्येने ही निवेदने प्रशासनाला देता येतील. निवेदन देताना मंदिर विश्वस्त, हिंदुत्ववादी संघटनांचे प्रमुख, कार्यकर्ते, हिंदुत्वनिष्ठ यांचा मोठ्या संख्येने सहभाग करून घ्यावा. निवेदन देताना, प्रशासकीय कार्यालयाबाहेर हातात फलक धरून समूहाने उभे राहून व्हिडिओ बाईट घेणे, मान्यवरांच्या २ मिनिटांच्या व्हिडिओ बाईट घेणे (वकील, मंदिर विश्वस्त, लोकप्रतिनिधी, हिंदुत्ववादी संघटनांचे प्रमुख आदी. स्थानिक वर्तमानपत्रांना बातम्या देणे. स्थानिक न्यूज चॅनलला व्हिडिओ बाईट आणि बातमी देणे, असे आवाहन मंदिर महासंघातर्फे करण्यात आले आहे.

# राजेशाही लूक असलेला सुलतान कोंबडा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजेशाही लूक असलेला सुलतान कोंबडा म्हणजे ही एक ऐतिहासिक आणि दिमाखदार दिसणारी कोंबडीची जात आहे. जी एकेकाळी राजदरबारातील शोभा मानली जात होती.

जगात सर्वप्रथम तुर्कस्तान (टर्की) मधील इस्तंबूल येथील टॉपकापी पॅलेसमध्ये या कोंबड्याची पैदास करण्यात आली. या ब्रीडची पैदासच मुळी राजदरबारातील बागेत फिरण्यासाठी व शोभेसाठीची कोंबडी म्हणून केली जाते. सुलतान कोंबडी हा सर्वात सुंदर व दुर्मिळ कोंबडीच्या जातीपैकी एक मानला जातो याचे स्वरूप राजेशाही असल्यामुळेच याला हे सुलतान नाव दिले आहे. या कोंबडीच्या



डोक्यावर पांढऱ्या मऊ पिसांचा मुकुट दिसतो.

**खास वैशिष्ट्य**

मिश्या आणि दाढी, चेहऱ्यावर मऊ घनदाट पिसे असल्याने त्याच्या चेहऱ्यावर मिश्या व दाढी असल्यासारखी वाटते. पाय पिसांनी

पान ३ वर



# रोटरी क्लबतर्फे अमळनेर येथे महारक्तदान शिबिर

## १०८ दात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- रोटरी क्लब व प्रताप महाविद्यालयातर्फे सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी झालेल्या महारक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १०८ जणांनी रक्तदान करून शिबिर यशस्वी केले आहे.

महारक्तदान शिबिरात विद्यार्थी, रोटरी क्लब व अनेक नागरिकांनी सहभाग नोंदविला. प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांच्या हस्ते महारक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी एन. एस. एस. अधिकारी डॉ. हेमंत पवार, एन. सी. सी. अधिकारी डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. धीरज वैष्णव, प्रा. भानुदास गुलाले, प्रा. सोनुसिंग पाटील, प्रा. प्रशांत ठाकूर आदी प्रमुख अतिथी होते. या शिबिरात प्रताप महाविद्यालयात ५० रक्तदाते, तर पीबीए इंग्लिश स्कूलच्या रोटरी हॉल येथे ५८ रक्तदाते असे एकूण १०८ दात्यांनी सहभाग नोंदविला. जीवन श्री ब्लड सेंटर व जीवन ज्योती ब्लड सेंटर धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने ब्लड बँक टीमच्या सदस्यांनी रक्त संकलन केले. रोटरी क्बलचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, सदस्य प्रतीक जैन, अभिजीत भंडारकर, अजय रोडगे, रोहित सिंघवी, विवेक देशमुख, दिनेश रहेजा, डॉ. राहुल मुठे, ताहा बुकवाला, किर्ती कोठारी, महेश पाटील, पूनम कोचर, तसेच रोट्रॅक्ट प्रतिनिधी ध्रुव पारख, निधीश कोचर, कुशल गोलेछा, रीशी जैन, वेंकटेश शर्मा, देवेश कोचर, फलेश बोथरा यांच्यासह वेदांत कुलकर्णी, संतोष पाटील, पूजा कासार, जितेंद्र पाटील, हर्ष कायदे, प्रियांका सैंदाणे, रोशनी महाजन, हेमांगी महाजन, योगेश महाले, गणेश पाटील आदींनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# भारतातील सर्वात अनोखे शहर

**आतापर्यंत तब्बल २१ वेळा बदलले नाव**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील अनेक शहरे जगभरात प्रसिद्ध आहेत. लोकसंख्येच्या बाबतीत दिल्ली हे देशातील सर्वात मोठे शहर आहे. देशात मुंबईलाही खास महत्त्व आहे. मात्र, एका शहराचे नाव २१ वेळा बदलले गेले आहे. याची माहिती जाणून घेऊयात भारतात अनेक अशी शहरे आहेत, जी प्राचीन काळापासून वसलेली आहेत. आज आपण भारतातील एका अशा शहराची माहिती जाणून घेणार आहोत. ज्याचे नाव एक-दोन वेळा नव्हे तर तब्बल २१ वेळा बदलण्यात आले आहे.

२१ वेळा नाव बदललेले शहर म्हणजे उत्तर प्रदेशातील कानपूर. याचे नाव भूतकाळात सुमारे २१ वेळा बदलले आहे. हे शहर त्याच्या संस्कृती, शैली आणि पाककृतीसाठी प्रसिद्ध आहे. कानपूरचे मूळ नाव कान्हापूर होते. त्याची स्थापना हिंदू सिंह चंदेल यांनी केली होती. त्यानंतर या शहराचे नाव वेळोवेळी बदलले आहे. मुघलांपासून ब्रिटिशांपर्यंत सर्वांनी त्याच्या नावात बदल केलेला आहे. ब्रिटिश राजवटीत कानपूर हे सत्तेचे एक प्रमुख केंद्र होते. कानपूरचे नाव शेवटचे १९४८ मध्ये बदलण्यात आले, असे म्हटले जाते. मात्र, त्यानंतर या शहराचे नाव बदललेले नाही. ब्रिटिश राजवटीत या शहराल कॉनपूर असे म्हटले जात होते. मात्र, स्वातंत्र्यानंतर या शहराचे नाव कानपूर असे करण्यात आले आहे.

# दाऊद इब्राहीम की पाब्लो एस्कोबार दोघांमध्ये सर्वात श्रीमंत कोण?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जागतिक गुन्हेगारीच्या इतिहासात दाऊद इब्राहिम आणि पाब्लो एस्कोबार यांच्याइतकी कुप्रसिद्ध नावे फार कमी आहेत. एक फरार अंडरवर्ल्ड डॉन आहे, जो २०२५ मध्येही पडद्यामागून आपल्या टोळ्या चालवित आहे. तर दुसऱ्याचे गुन्हेगारी साम्राज्य तीन दशकांपूर्वीच कोसळले आहे. दोघांनीही अवैध व्यवसायांमधून प्रचंड संपत्ती कमावली आहे. ड्रग्ज, तस्करी आणि खंडणी यांचा समावेश होता. एस्कोबारचे साम्राज्य १९९३ मध्ये संपुष्टात आले, तर दाऊद इब्राहिमच्या विविध टोळ्या आजही आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे कायद्याच्या कचाट्यातून निसटत आहेत. या पार्श्वभूमीवर दोन्ही जागतिक गुन्हागारांच्या संपत्तीचा आढावा पहा.


**पाब्लो एस्कोबार**

पाब्लो एमिलियो एस्कोबार गॅव्हिरिया (१९४९- १९९३) सुरुवातीला कोलंबियाच्या खेड्यांमध्ये किरकोळ चोऱ्या करायचा. नंतर हळू हळू तो मेडेलिन कार्टेलचे नेतृत्व करू लागला. १९८० च्या दशकाच्या मध्यापर्यंत जागातील कोकेनचा ८० टक्के व्यापार तो चालवायचा. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात, हे कार्टेल अमेरिकेत दररोज १५ टन कोकेनची तस्करी करायचे. यातून त्यांना आठवड्याला ४२० दशलक्ष डॉलर्स आणि वार्षिक २१. ९ अब्ज डॉलर्स इतके उत्पन्न मिळत होते. फोर्ब्सने १९८७ मध्ये पाब्लो एस्कोबारचा जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत समावेश केला होता. त्यावेळी त्याची एकूण संपत्ती ३ अब्ज डॉलर्स होती. १९८९ पर्यंत तो जगातील सर्वाधिक श्रीमंतांच्या यादीत सातव्या क्रमांकावर होता. १९९३ मध्ये एस्कोबारच्या मृत्यूच्या वेळी त्याची एकूण संपत्ती सुमारे ३० अब्ज डॉलर्स इतकी होती. त्यावेळी अमेरिकन अधिकाऱ्यांनी कोलंबियामध्ये ४- ५ अब्ज डॉलर्स रोख लपवले असल्याचे म्हटले जाते. नुसार त्याचे मूल्य ७०-८० अब्ज डॉलर्स इतके आहे. काही विश्लेषणांनुसार, आज त्याची संपत्ती १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. ज्यात १० अब्ज डॉलर्स कोकेनच्या व्यापारातून मिळाले आहेत.

**दाऊद इब्राहिम**

१९७० च्या दशकात मुंबईत डी-कंपनी नावाची गुन्हेगारी टोळी स्थापन करणारा दाऊद इब्राहिम कासकर (जन्म १९५५) भारतातील मोस्ट वॉन्टेड फरारी आरोपी आहे. सध्या तो कथितपणे पकिस्तानातील कराचीमध्ये राहत असल्याचे

**पान ३ वर**





# थंडीत चुकूनही खाऊ नका ही एक भाजी

## सांध्यातील युरिक ॲसिड चटकन वाढून होईल संधिवात



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण रोज खातो त्या पदार्थांमध्ये काही घटक असे असतात, की जे शरीरात शांतपणे बदल घडवत राहतात. सुरूवातीला त्याचा काही अंदाज येत नाही. मात्र हळूहळू त्यांच्या परिणामांची जाणीव वेदना, सूज किंवा थकवा यांच्या रूपाने जाणवू लागते. अनेकांना वाटते की हे त्रास वयानुसार येतात. पण प्रत्यक्षात काही छोटे आहारातील निर्णय शरीरात अशा प्रक्रियांना चालना देतात, ज्या पुढे गंभीर समस्या बनू शकतात. विशेषतः शरीरातील शुद्धीकरणाशी संबंधित एक महत्त्वाची प्रक्रिया जर मंदावली, तर दबाव वेगवेगळ्या अवयवांवर जाणवू लागतो. काही लोकांना हातपायांमध्ये जडपणा, सांध्यांमध्ये जळजळ जाणवते. हे सगळे एकाच गोष्टीकडे संकेत देत असते. पण आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. आश्चर्य म्हणजे या त्रासाला मोठ्या औषधोपचारांची गरज नसते. फक्त काही पदार्थांचा योग्य वापर किंवा टाळणी केली तरी स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारू शकते. काही भाज्या अगदी निरोगी मानल्या जातात. मात्र शरीरातील विशिष्ट स्थितीत त्या उलट परिणाम करतात. त्यामुळे कोणत्या अवस्थेत काय खावे आणि काय टाळावे, हे समजून घेणे गरजेचे ठरते.

**शरीरात युरिक ॲसिड का वाढते?**

आपल्या शरीरात रोज अनेक रासायनिक प्रक्रिया सुरू असतात. त्यातून काही अवशिष्ट घटक तयार होतात. त्यातील एक म्हणजे युरिक ॲसिड. हे विषारी नसले तरी त्याची मात्रा वाढली तर शरीरावर ताण येतो. किडनी हे ॲसिड बाहेर टाकतात. मात्र त्यांची कार्यक्षमता कमी झाली तर हे घटक रक्तात साचू लागतात. त्याचा परिणाम प्रथम सांध्यांवर जाणवतो आणि वेदना होऊ लागतात. काही लोकांमध्ये पायांच्या बोटांपासून त्रास सुरू होतो आणि हळूहळू हातांपर्यंत पोहोचतो. आहारात प्युरिन जास्त असला, तर युरिक ॲसिड स्वतःहून वाढते. म्हणूनच योग्य पदार्थ निवडणे महत्त्वाचे ठरते. वेळेवर लक्ष दिले तर गंभीर गुंतागुंत सहज टाळता येते.

### युरिक ॲसिड कमी ठेवण्यासाठी काय बदल करावेत?

या त्रासावर नियंत्रण ठेवण्यासाठी आहारातील छोटे बदल खूप महत्त्वाचे ठरतात. कमी प्युरिन असलेले पदार्थ निवडावेत आणि भरपूर पाणी प्यावे. डाळी, काही फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्ये यांचा वापर वाढवावा. व्यायामामुळे वजन नियंत्रणात राहते आणि ॲसिडची पातळी कमी होण्यास मदत होते. दररोज ७-८ तास झोपही शरीरातील दाह कमी करते. डॉक्टर सांगतात, की नियमित तपासणी केल्यास पातळी किती आहे, हे लक्षात येते. आहाराची दिशा ठरविता येते. थोड्या जागरूकतेने हा त्रास पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येतो.

**चुकीच्या आहारामुळे वाढणाऱ्या समस्या**

आजकाल अनेकांच्या आहारात लाल मांस, प्रक्रिया केलेले मांस किंवा काही प्रकारचे मासे जास्त प्रमाणात असतात. हे पदार्थ प्युरिनमध्ये समृद्ध असतात आणि युरिक ॲसिड झपाट्याने वाढवितात. त्यातच अल्कोहोल किंवा बिअर घेतली तर मूत्रपिंडावर अतिरिक्त ताण येतो. अशी स्थिती जास्त काळ राहिली तर शरीराला शुद्धीकरण कठीण होते. सांधे दुखू लागतात, चालताना त्रास होतो आणि सूज वाढते. काहींना रात्री पायांत मुंग्या येतात. हे सगळे शरीर देत असलेले संकेत असतात. आहार बदलला तर ही लक्षणे काही दिवसांत कमी होऊ शकतात.

**भेंडीचे फायदेही समजून घेणे गरजेचे**

भेंडी आरोग्यासाठी अनेक प्रकारे उपयोगी आहे. तिच्यात फक्त ३५ कॅलरीज असतात. त्यामुळे वजन नियंत्रित ठेवू इच्छिणाऱ्यांसाठी ती उत्तम पर्याय मानली जाते. त्यात असलेला फोलेट रक्तनिर्मितीसाठी महत्त्वाचा असतो. व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि पोटॅशियम शरीरातील पेशींना सुरक्षित ठेवतो. फायबरमुळे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी होते. मधुमेह असलेल्या लोकांसाठीही ही भाजी फायदेशीर आहे. पण हे फायदे असूनही युरिक ॲसिड वाढलेले असेल तर ती तात्पुरती टाळणेच शहाणपणाचे ठरते.

### भेंडी युरिक ॲसिड वाढवते कशी?

अनेकांना वाटते की भेंडी ही हलकी, पचायला सोपी आणि आरोग्यदायी भाजी असल्याने सर्वांसाठी उत्तम आहे. पण ज्यांच्या शरीरात युरिक ॲसिड जास्त आहे त्यांनी ती खाल्ली तर स्थिती आणखी बिघडू शकते. भेंडीमध्ये प्युरिनचे प्रमाण तुलनेने जास्त असते आणि शरीरात जाताच ते युरिक ॲसिडमध्ये रूपांतरित होते. त्यामुळे सांध्यांमध्ये जळजळ, वेदना आणि सूज वाढू शकते. काही लोकांना ही भाजी खाल्ल्यानंतर पाय आणि हातांमध्ये कडकपणा जाणवतो. शरीर आम्लीय बनल्यास ॲसिड बाहेर टाकण्याची प्रक्रिया आणखी मंदावते. म्हणून तज्ज्ञ अशा स्थितीत भेंडी टाळण्याचा सल्ला देतात.

---

जिद्द आणि कष्टाचे फळ

# दोन म्हशींपासून कोट्यवधींच्या दुग्ध साम्राज्यापर्यंतची यशोगाथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चंद्रकलाबाई प्रभूआप्पा आल्लमखाने यांचा प्रवास हा कष्ट, चिकाटी आणि आत्मविश्वासाचा एक उजळदार आदर्श आहे. दोन म्हशींपासून सुरू झालेल्या दुग्धव्यवसायाने आज कोट्यवधी रुपयांची उलाढाल करत कोट्यवधींचे दुग्ध साम्राज्य उभे केले आहे. ७८ वर्षांच्या वयातही त्या कामाच्या धडपडीत असून, शेतकरी आणि महिला उद्योजकांसाठी प्रेरणास्रोत बनल्या आहेत.

**कष्टाचे बीज : दोन म्हशींपासून सुरूवात**

नांदेडमधील दुग्धव्यवसाय क्षेत्रात चंद्रकलाबाईंचे नाव प्रेरणेचे प्रतीक आहे. मूळचे उदगीरचे असलेले हे कुटुंब तीन पिढ्यांपासून नांदेडमध्ये वास्तव्य करते. कौटुंबिक वाटाघाटीत त्यांना फक्त दोन म्हशींचा ठेवा मिळाला. त्या दोन म्हशींपासूनच चंद्रकलाबाईंनी आपले दुग्ध साम्राज्य उभारण्यास सुरूवात केली. पारंपरिक दूध विक्री व्यवसायाच्या आव्हानांना तोंड देत त्यांनी घरोघरी दूध, दही आणि तूप विक्री सुरू केली. संसाराचा खर्च भागवण्यासाठी शेणाच्या गोवऱ्या थापण्याचे काम केले. पती प्रभूआप्पा यांनी जनावरांसाठी चारा विक्री करून हातभार लावला.

**शेत आणि फार्म हाऊसमध्ये विस्तार**

दुग्धव्यवसायाच्या यशावर विश्वास ठेवून चंद्रकलाबाईंनी अर्धापूर तालुक्यातील लहान शिवारात १० एकर जमीन खरेदी केली. ही जमीन म्हशींसाठी फार्म हाऊस म्हणून विकसित केली. फार्म हाऊसमध्ये म्हशींची काळजी, चारा व्यवस्थापन आणि दूध उत्पादनाच्या दर्जावर त्या वैयक्तिक लक्ष देतात. वयाच्या ७८ व्या वर्षीही त्या दुकान सांभाळतात, फार्म हाऊसवर जाऊन शेण गोळा करतात आणि पाणी पुरवठा करतात. त्यांची ही चिकाटी नव्या पिढ्यांना प्रेरणा देते.

सक्सेस स्टोरी



### डेअरीची उभारणी आणि व्यवसायाची वाढ


कालांतराने हे दाम्पत्य जुना मोंढा भागात पत्र्याच्या शेडमध्ये 'दूध डेअरी' सुरू करण्यास सक्षम झाले. गुणवत्ता आणि दर्जा जपल्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढला. पाहता पाहता व्यवसाय विस्तारित होत स्वतःची जागा खरेदी करून घर आणि पक्के दुकान बांधले. दोन म्हशींपासून सुरू झालेला हा व्यवसाय आता ६५ म्हशींच्या दुग्ध साम्राज्यात विकसित झाला आहे. आज त्यांच्या डेअरीमध्ये दररोज २,५०० लिटर दूध विकले जाते. याशिवाय, दही, तूप आणि इतर दुग्ध पदार्थांची विक्रीही होते. या व्यवसायातून महिन्याला कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते.

**एकत्र कुटुंब पद्धत आणि वारसा**

चंद्रकलाबाईंचे तीन मुले, नातू आणि पणतू असे एकूण १९ जणांचे एकत्र कुटुंब आजही एका छताखाली राहते. ही एकत्र पद्धत टिकवून ठेवणे आजच्या युगात प्रेरणादायी आहे. मुले आणि नातवंडेही आता दुग्ध व्यवसायात सहभागी झाले असून, व्यवसाय अधिक गतीने वाढत आहे. चंद्रकलाबाईंचा प्रवास फक्त दुग्धव्यवसायाचा नव्हे, तर संघर्ष आणि यशाची गोष्ट आहे. दोन म्हशींपासून कोट्यवधींच्या साम्राज्यापर्यंतचा हा प्रवास शेतकरी, महिला उद्योजक आणि नवोदित व्यवसायींना नवे दिशादर्शन करतो. त्यांच्या जीवनातून शिकतो, की प्रत्येक

---

दै. ग्लोबल महातेजच्या एका वाचकाने प्रसिद्धीसाठी पाठवलेले सन १९८२ मधील किराणा मालाचे दर



| मालाचा प्रकार | रु. | पै. |
|---|---|---|
| गहू १२ किलो | ३२ | ४० |
| तांदूळ ५ कि. | १७ | ०० |
| साखर ५ कि. | २२ | ०० |
| हरभरा डाळ २ कि. | ८ | ०० |
| शेंगदाणे | ७ | ५० |
| साबूदाणे १ कि. | ७ | ०० |
| रॉकेल डबा | ३४ | ०० |
| तूरडाळ १॥ किलो | १० | ५० |
| दळलेले मीठ | – | ५० |
| जाड मीठ | – | २५ |
| पोहे १ किलो | ३ | ७५ |
| रवा २ किलो | ६ | ४० |
| मैदा | ३ | ५० |
| लाईफ बॉय २ | ४ | ५० |
| निरमा पावडर | ६ | ०० |
| मोती साबन १ | ५ | ०० |
| जिरे १०० ग्रॅम | ३ | ०० |
| मोहरी १०० ग्रॅम | १ | ०० |
| हळद १०० ग्रॅम | १ | ०० |
| गोडेतेल ३ किलो | ४६ | ४० |
| डालडा तूप २ कि. | ३२ | ०० |
| पीठी साखर अर्धा कि. | ३ | ०० |
| गुळ अर्धा. किलो | १ | ५० |



---

# कांद्यावरील काळी बुरशी : व्हायरल व्हिडिओ खरे की खोटे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सोशल मीडियावर सध्या बरेच विविध व्हिडिओ व्हायरल होत आहेत. ज्यात कांद्याच्या सालीवरील काळी बुरशी ही जीवघेणी आणि धोकादायक असल्याचा दावा केला जात आहे. या व्हिडिओमध्ये कथितपणे 'स्टॅफिलम कवी' नावाच्या बुरशीचा उल्लेख केला जातो. यातील सत्य काय आहे? ते तज्ज्ञांच्या माहितीच्या आधारे याबाबत स्पष्टता दिली आहे.**



### कांद्यावरील काळी बुरशी काय आहे?

कांद्यावर सामान्यतः आढळणारी काळी बुरशी ही एस्परजिलस नायजर या प्रजातीची असते. ही बुरशी कांद्याच्या सालीवर, तसेच इतर भाज्या आणि फळांवर (उदा.- लसूण, केळी) वाढते. ही बुरशी पर्यावरणात नैसर्गिकरित्या आढळते. सामान्यतः मानवासाठी धोकादायक नसते.

### बुरशीचा भाग खाल्ल्यास काय होऊ शकते?

चुकून कांद्यावरील काळा थर किंवा बुरशीचा थोडा भाग खाल्ल्यास सामान्यतः कोणताही गंभीर धोका उद्भवत नाही. तथापि, काही संवेदनशील व्यक्तींना ॲलर्जी किंवा सौम्य पचनसंस्थेच्या तक्रारी (उदा.- पोटदुखी) होऊ शकतात.

### स्टॅफिलम कवी नावाची बुरशी खरी आहे का?

नाही. स्टॅफिलम कवी नावाची कोणतीही बुरशी वैज्ञानिकदृष्ट्या अस्तित्वात नाही. हे नाव पूर्णपणे काल्पनिक आहे. भीती आणि गैरसमज पसरविण्यासाठी सोशल मीडियावर ते वापरले गेले आहे.

### कांद्यावर बुरशी का येते?

अयोग्य साठवणूक : उच्च तापमान आणि आर्द्रता यामुळे कांद्यावर बुरशी वाढण्यास अनुकूल वातावरण तयार होते.

खराब झालेले कांदे : कांद्याला इजा झाल्यास किंवा तो खराब झाल्यास बुरशी वाढण्याची शक्यता वाढते.

मातीतील बुरशी : कांदा पिकवताना मातीत असलेले जीवाणू आणि बुरशी यामुळे बुरशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो.

### काळजी म्हणून काय करावे?

- कांद्याच्या सालीवर किंवा आतील भागात काळा थर दिसल्यास तो पूर्णपणे कापून काढा आणि केवळ निरोगी भाग वापरा.
- जर बुरशी कांद्याच्या खोलवर पसरली असेल, तर तो कांदा टाकून द्या.
- कांदे स्वच्छ धुऊन आणि योग्यरित्या साठवून (थंड, कोरड्या जागी) बुरशीचा प्रादुर्भाव टाळा.

### संक्रमणाचा धोका कोणाला?

ज्या व्यक्तींची रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे (उदा.- गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्ण) त्यांना एस्परजिलस नायजरमुळे दुर्मिळ प्रकरणांमध्ये संसर्ग होण्याचा थोडा धोका असू शकतो. मात्र सामान्य व्यक्तींसाठी ही बुरशी जीवघेणी नाही. कांद्यावरील काळी बुरशी (एस्परजिलस नायजर) ही सामान्य आहे. ती मानवासाठी सहसा धोकादायक नसते. स्टॅफिलम कवी नावाच्या जीवघेण्या बुरशीचा दावा पूर्णपणे खोटा आहे. व्हायरल व्हिडिओमुळे घाबरण्याऐवजी कांद्याचा बुरशीग्रस्त भाग कापून टाकून उरलेला भाग स्वच्छ करून वापरा. सोशल मीडियावरील दाव्यांवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची खातरजमा करा.

---

# 'इस्त्री प्रकल्प': कोळशाच्या इस्त्रीपासून एलपीजीकडे

## इंधनखर्च निम्म्यावर आल्याने इस्त्रीवाल्यांच्या आयुष्यात क्रांती



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रस्त्याच्या कडेला कोळशाच्या इस्त्रीने कपडे लावणारे इस्त्रीवाले आता हळूहळू बदलत्या काळाशी जुळवून घेत आहेत. उद्यम व्यापारच्या 'इस्त्री प्रकल्पा'च्या माध्यमातून पारंपरिक कोळशाच्या इस्त्रीला एलपीजीवर चालणाऱ्या इस्त्री पेट्यांनी पर्याय दिला जात आहे. यामुळे इस्त्रीवाल्यांचा इंधनखर्च निम्म्याने कमी झाला. त्यांच्या कामाच्या उत्पादकतेत दोन तासांची वाढ झाली आहे.

एलपीजी इस्त्री : कार्यक्षमता आणि उत्पन्नात वाढ

कोळशाच्या इस्त्रीला गरम होण्यासाठी दररोज सुमारे दोन तास लागायचे, तर एलपीजी इस्त्री केवळ दोन मिनिटांत तयार होते. यामुळे इस्त्रीवाले अधिक ग्राहकांना सेवा देऊ शकतात आणि अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात. स्वच्छ इंधनाचा पर्याय म्हणून एलपीजीचा वापर केल्याने त्यांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम कमी होतो आणि पर्यावरणाचेही रक्षण होते.

प्रकल्पाचा विस्तार आणि प्रभाव

गेल्या चार वर्षांत 'इस्त्री प्रकल्प' बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, जयपूर आणि दिल्ली या पाच शहरांत पोहोचला आहे. आतापर्यंत ८,००० हून अधिक इस्त्री व्यावसायिकांना याचा लाभ मिळाला आहे. या प्रकल्पामुळे त्यांच्या उत्पन्नात सरासरी २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरवर्षी ६,००० टनांहून अधिक कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे. उद्यम लर्निंगचे सहसंस्थापक कृष्णन रंगनाथन म्हणाले, की लघुउद्योजक हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. योग्य पाठबळ मिळाल्यास ते समाजाच्या मोठ्या वर्गाचे जीवनमान उंचावू शकतात. या प्रकल्पामुळे सप्टेंबर २०२५ पर्यंत इस्त्रीवाल्यांच्या उत्पन्नात १०० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. हा आमच्यासाठी आणि बदल स्वीकारणाऱ्या हजारो इस्त्री व्यावसायिकांसाठी अभिमानाचा क्षण आहे. कार्यक्रम प्रमुख सिरिल जोसेफ म्हणाले, की इंधनखर्च कमी करणे आणि कार्यक्षमता वाढवणे हा या प्रकल्पाचा मूळ हेतू होता. कोळशाऐवजी एलपीजीचा वापर स्वीकारून इस्त्रीवाले आपल्या व्यवसायात प्रगती करत आहेत, तसेच पर्यावरणरक्षणातही योगदान देत आहेत. स्थानिक उपजीविकेच्या उपाययोजना राष्ट्रीय स्तरावर सकारात्मक बदल घडवू शकतात, हे या प्रकल्पाने दाखवून दिले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# अहिराणी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा

## प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी ; अमळनेर येथे खान्देश साहित्य संघाची सभा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- अहिराणी बोलीभाषा ही अतिशय पुरातन असून तीला इ. स. पूर्व तीन हजार वर्षाचा इतिहास आहे. ही भाषा समृद्ध असून, तिला मराठी भाषेप्रमाणेच अभिजात भाषेचा दर्जा मिळणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत खान्देश साहित्य संघाचे महाराष्ट्र चे केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

येथील काटे पॅलेस येथे रविवार, दि. ७ रोजी झालेल्या साहित्य संघाच्या विशेष सभेत ते बोलत होते. जिल्हाध्यक्ष शरद धनगर, जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रा. डॉ. सूर्यवंशी पुढे म्हणाले, की अहिराणी बोलीभाषेचा प्रचार व प्रसारासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे. शासन स्तरावर अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी चळवळ उभारण्याची गरज आहे. आपली बोलीभाषा टिकवून ठेवणे हे प्रत्येक खान्देशवासियांचे कर्तव्य आहे.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाने सभेला सुरूवात झाली. त्यानंतर डॉ. मिर्झा बेग यांच्यासह दिवंगत साहित्यिक व कवींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी विविध साहित्यिक, भाषिक आणि संघटनात्मक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. जळगाव जिल्हा कार्यकारिणी जाहीर करून नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी वाल्मिक मराठे, कुणाल पवार, रजनी पाटील, रेखा मराठे, रत्नाकर पाटील, गोपाल हडपे, दत्तात्रय सोनवणे, मनोहर नेरकर, शरद पाटील, विशाल देशमुख, चंद्रकांत पाटील, पूनम साळुंखे, रूपाली पाटील, प्रतिभा पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान सभेतील उपस्थित साहित्यिकांनी खान्देशी संस्कृती, लोकपरंपरा, बोली संवर्धन व भविष्यातील साहित्यिक उपक्रम यावर सकारात्मक मते व्यक्त केली. अहिराणी भाषेच्या संवर्धनासाठी व्यापक जनजागृती, अभ्यास, संशोधन व शासकीय पातळीवर निवेदन देण्याचा ठराव सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. जिल्हा सचिव उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले. सुनीता पाटील यांनी आभार मानले.



*अमळनेर – नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्त पत्र देताना केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी. शेजारी जिल्हाध्यक्ष शरद धनगर, जिल्हा सचिव उमेश काटे व जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर आदी.*

### जळगाव जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**जळगाव जिल्हा उर्वरीत कार्यकारिणी अशी उपाध्यक्ष- डी. ए. धनगर, उपाध्यक्ष-रजनी पाटील, कार्याध्यक्ष- वाल्मीक मराठे, कोषाध्यक्ष- रमेश धनगर, प्रसिद्धी प्रमुख- निरंजन पेंढारे, कार्यवाह- गोकुळ बागुल, मनोहर नेरकर, संघटक- रत्नाकर पाटील (अमळनेर), किशोर पाटील (चोपडा), आशा सोनवणे, (जळगाव), डॉ. सुवर्णा पाटील (भडगाव), सदस्य- रामकृष्ण बाविस्कर, रामेश्वर भदाणे, पूजा पाटील, कल्पना पाटील, मार्गदर्शक /सल्लागार- डॉ. डिगंबर महाले, कृष्णा पाटील, हिरामण कंखरे, सुभाष पाटील- घोडगावकर यांचा समावेश आहे.**

पान १ वरून

### दाऊद इब्राहीम की पाब्लो एस्कोबार दोघांमध्ये सर्वात श्रीमंत कोण?

वृत्त आहे. त्याच्यावर १९९३ चा मुंबई बॉम्बस्फोट, ड्रग्ज तस्करी आणि दहशतवादाला पैसे पुरवणे यासारखे अनेक आरोप आहेत. जगभरातील विविध देशांमध्ये चालविलेल्या वैध- अवैध व्यवसायातून त्याची कमाई होते. त्याच्या एकूण उत्पन्नात ४० टक्के कमाई भारतातून होत. फोर्ब्सच्या शेवटच्या अधिकृत अंदाजानुसार (२०१५) याची एकूण संपत्ती ६७ अब्ज डॉलर्स होती. २०२५ च्या गुप्तचर विश्लेषणातही याला दुजोरा दिला आहे. पाब्लो एस्कोबारची संपत्ती दाऊद इब्राहिमपेक्षा कित्येक पटींनी जास्त आहे. एस्कोबारचे हिंसाचाराने बरबटलेले आयुष्य गुन्हेगारीतून संपत्ती किती वेगाने वाढू शकते आणि ती कशी कोसळू शकते याचे दर्शन घडवते. इब्राहिमची एकूण संपत्ती एस्कोबारच्या तुलनेत खूप कमी आहे. मात्र, तरीही पडद्यामागे राहण्याच्या दाऊदच्या वृत्तीमुळे तो आणि त्याचे गुन्हेगारी साम्राज्य आजही कायद्याच्या कचाट्यातून सातत्याने निसटत असल्याचे पाहायला मिळते.

### राजेशाही लूक असलेला सुलतान कोंबडा

झाकलेले असतात बोटांवरही पिसे असतात. त्याचबरोबर पाच बोटे असतात हेही एक वेगळेपण. बहुतेक सुलतान हे अगदी पांढऱ्या रंगाचेच असतात. काही ठिकाणी काळ्या रंगात असतात. यामधील नर वजनः २- २.७ किलो, मादी वजन : १. ५-२ किलो असते.

अतिशय शांत, मवाळ, मैत्रीपूर्ण असल्यामुळे घरात ठेवण्यासाठी लोकप्रिय असते. अगदी नाजूक जात – पावसात व चिखलात लगेच पिसे मळतात. यामुळे याचे पालन करताना स्वच्छ, कोरडे वातावरण आवश्यक असते. याची किंमतही जास्त असते एक पिल्लू १५०० ते ४ हजार रुपयापर्यंत तर पूर्ण वाढ झालेले चिकनः ५ हजार ते १० हजार असते.



# धनदाई महाविद्यालयात एड्सविषयी जनजागृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील धनदाई महाविद्यालयात रेड रिबन क्लब आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी एड्स जनजागृती उपक्रम घेण्यात आला. सुरुवातीला महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक अश्वमेघ पाटील, दीपक शेलार, जयेश मोर आणि देवेंद्र मोर यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ह.एड्सविषयी मूलभूत माहिती, संसर्गाची कारणे तसेच उपचार पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

एकजुटीने 'एचआयव्हीला लढा देऊ, नवे परिवर्तन घडवू' या या घोषवाक्याने या वर्षाच्या उपक्रमाला दिशा देण्याचा संकल्प करण्या आला. किसान महाविद्यालयाचे डॉ. माणिक बागले, मारवड महाविद्यालयाचे डॉ. जितेंद्र माळी व प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांनी एड्सविषयी जनजागृतीचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. डॉ. महादेव तोंडे, डॉ. लीलाधर पाटील, प्रा. मीनाक्षी इंगोले, प्रा. रवींद्र चौधरी, डॉ. भगवान भालेराव आदींनी सहकार्य केले.

### मोबाईलची एक्सपायरी डेट असते का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवा स्मार्टफोन खरेदी करताना त्याचे फिचर आणि कॉन्फिग्रेशन तपासून इतर मोबाईलची तुलना केली जाते. मुळात मोबाईलची अशी एक्सपायरी डेट असते का? एक स्मार्ट फोन किती काळासाठी तुम्ही वापरू शकता? याबाबत जाणुन घेऊयात. स्मार्ट फोनची अधिकृत अशी एक्सपायरी डेट नसते. मात्र, मोबाईल किती काळ वापरायचा याचा अंदाज सॉफ्टवेअर अपडेटवरून ठरविता येतो. एखाद्या स्मार्टफोनला किती काळ सॉफ्टवेअर अपडेट मिळतात, हे पाहून मोबाईल तेवढ्या काळ वापरता येऊ शकतो. त्यानंतर अपडेट बंद झाल्यास मोबाईल एक्सपायर झाला असे मानले जाते. विशेष म्हणजे जेव्हा मोबाईल लॉंच होतो तेव्हापासून ७ वर्षापर्यंत अपडेट मिळतात. आयफोनबाबत बोलायचे झाले तर याचे ५ ते ७ वर्षे सॉफ्टवेअर अपडेट येतात. मात्र, एक आयफोन सात वर्षे वापरता येतो. चिनी बनावटीच्या मोबाईलसाठी ४ ते ५ वर्षेच सॉफ्टवेअर अपडेट येतात. त्यानंतर मोबाईल वापरणे धोकादायक असू शकते. मोबाईल हॅक होऊ शकतो.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने पत्रकारितेला दिली नवसंजीवनी

## सोलापूर केडर कॅम्प व 'शूर सरदार' सन्मान सोहळ्यात मान्यवरांचे मार्गदर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- 'व्हॉईस ऑफ मीडिया' व 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम'च्या वतीने पत्रकारितेला नवसंजीवनी देणाऱ्या भव्य 'केडर कॅम्प'चा सोलापूरमध्ये उत्साहात समारोप झाला. पंढरपूर अधिवेशन यशस्वी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा 'शूर सरदार' सन्मान सोहळाही या कार्यक्रमात आयोजित करण्यात आला होता.

आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, शेतकरी नेते रविकांत तुपकर व ज्येष्ठ मार्गदर्शक-विचारवंत आमदार श्रीकांत भारतीय यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. ज्येष्ठ पत्रकार-विचारवंत रवींद्र चिंचोलकर, संचालक व्यंकटेश जोशी, राष्ट्रीय कोषाध्यक्ष चेतन बंडेवार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकारितेची तुलना समाजाच्या आरोग्याशी करताना सांगितले, की डॉक्टर जसे शरीर तपासतात, तसे पत्रकार समाजाच्या विचारांची आणि लोकशाहीच्या नाडीची तपासणी करतात. व्हॉईस ऑफ मीडियाने पत्रकारांना दिशा, संरक्षण आणि अभिमानाची नवी ओळख दिली आहे. पत्रकारितेतील सत्य, पारदर्शकता आणि लोकहिताची भूमिका त्यांनी विशेषत्वाने अधोरेखित केली. शेतकरी नेते रविकांत तुपकर म्हणाले, कीह व्हॉईस ऑफ मीडिया ही पत्रकार तयार करणारी आणि पत्रकारिता टिकवणारी संघटना आहे.

पत्रकारांच्या एकतेतच समाजातील अन्याय दूर करण्याची आणि लोकशाही मजबूत करण्याची खरी शक्ती आहे. कौशल्यविकास, प्रशिक्षण आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या संघटनेच्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले. आमदार श्रीकांत भारतीय म्हणाले, की जसा कर्ण कवच- कुंडल्यामुळे अजय झाला, तसे श्रद्धा, समर्पण आणि चारित्र्य असल्यास कोणतीही संघटना अढळ राहते. अहंकार बाजूला ठेवून सामूहिक भावनेने काम करणे हीच प्रगतीची गुरुकिल्ली आहे. संघटनात्मक चार मूलतत्त्वे संपर्क, बैठक, कार्यक्रम आणि निर्णय यांचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. संदीप काळे यांच्या जगातल्या पत्रकारितेला लागलेली घरघर' (मराठी) आणि 'The Hoarseness of Global Journalism' (English) या दोन पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

समारोपीय सत्रात संघटनात्मक बांधणी, नेतृत्व विकास, तत्त्वनिष्ठ कार्यपद्धती आणि पत्रकार एकतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात पंढरपूर, सोलापूर व महाराष्ट्रभरातील पदाधिकाऱ्यांचा 'शूर सरदार' म्हणून सन्मान करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कोर टीममधील दिव्या भोसले, स्नेहल पाटील, गोविंद जोशी व अक्षय श्रीकंठवार यांना गौरविण्यात आले. पंढरपूर व सोलापूर कोर टीममधील शिलेदारांबरोबरच मुख्य कोर टीम महाराष्ट्रातील गोरक्षनाथ मदने, अमोल मतकर, अजित कुंकूलोळ, कुमार कडलग, रश्मी मारवाडी, पल्लवी शेटे, संगम कोटलवार, नरेंद्र देशमुख, किशोर कारंजेकर, कल्पेश महाले, बापूसाहेब पाटील, वैशाली पाटील, चेतन कात्रे, आकाश अमृतवार, बाळासाहेब गडाख आणि गोरक्ष नेहे स्वागत खपाले, माऊली डांगे, सुरज कौलगे, सुरज सरवदे, बालाजी फुगारे, तौफिक नदाफ, धनराज बगले, सचिन राठोड, सौरभ वाघमारे, दत्ता केरे, सादिक नदाफ, विजय पारसेकर अमोल माने, संदीप बागल, तेजस गांजाळे, समाधान व्हनसाळे, गोपाळ माळी, गणेश गांडुळे, रोहिदास भोरकडे, यांचा सन्मान करण्यात आला.



*सोलापूर : 'व्हॉईस ऑफ मीडिया' व 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम'तर्फे आयोजित 'केडर कॅम्प' व 'शूर सरदार' सन्मान सोहळ्यात सहभागी मान्यवर.*

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# श्री दत्तगुरूंची अनुभूती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण अनेक वेळा ऐकतो मला दत्तगुरूंची अनुभूती झाली किंवा गुरूंनी दर्शन दिले. पण ही अनुभूती म्हणजे नेमकी काय गोष्ट आहे? नेहमीच ती डोळ्यांनी पाहिलेले दर्शन असते का? की ती फक्त स्वप्नात आलेली जाणीव असते?

श्री दत्तगुरूंची अनुभूती म्हणजे नेमके काय? सगुण आणि साकार दर्शन दिले तरच त्याला अनुभूती म्हणायचे का? की स्वप्नात येऊन काही सांगितले त्याला अनुभूती म्हणायचे? अनुभूती म्हणजे एक असा अनुभव जो केवळ चित्ताला प्रमाण होतो, ग्राह्य होतो.

श्री दत्तगुरूंची अनुभूती म्हणजे भक्ताला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दत्तगुरूंचा अनुभव येणे, जे अनेक स्वरूपात असू शकते, जसे की स्वप्नात दर्शन, ध्यानात साक्षात् अनुभव किंवा प्रकाशरूपातील दर्शन. दर्शन दिले तर ती निश्चितच मोठी अनुभूती आहे. पण केवळ दर्शन म्हणजेच अनुभूती नाही. दत्तगुरूंचे नाम घेण्याची बुद्धी होणे, ते घ्यावे हे चित्ताला वाटणे ही देखील अनुभूतीच आहे. ही अनुभूती भक्ताची तळमळ आणि श्रद्धेवर अवलंबून असते आणि दत्तगुरूंच्या कृपावैभवाचे प्रतीक मानली जाते.

समजा आपल्याला एखाद्या संकटाच्या वेळी अचानक कोणीतरी येऊन मदत करतो आणि मग नंतर तो व्यक्ती दिसतच नाही तर नकळत आपण देवाचे आभार मानतो आणि म्हणतो दत्तगुरूंनी दर्शन दिले. एखाद्या अडचणीत त्यांनी स्वप्नात येऊन दिलासा देणे म्हणजे एक प्रकारचे दत्ताचे अनुभूतीमूलक दर्शनच आहे हे खरे.कधी कोणतेही शब्द, स्वप्न नसतानाही प्रार्थनेनंतर मनात जे समाधान, शांती आणि निश्चितता वाटते, तीही एक दत्तगुरूंची अनुभूतीच असते.

**दत्त दत्त ऐसे लागले ध्यान,**
**हरपले मन झाले उन्मन,**
**मी तू पणाची झाली बोळवण,**
**एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान**
किंवा
**दत्त वसे औदुंबरी । त्रिशूल डमरू जटाधारी ॥**
**कामधेनू आणि श्वान । उभे शोभती समान ॥**
**गोदातीरी नित्य वस्ती । अंगी चर्चिली विभूती ॥**
**काखेमाजी शोभे झोळी । अर्धचंद्र वसे भाळी ॥**
**एका जनार्दनी दत्त । रात्रंदिन आठवीत ॥**

त्यांचे कोणत्याही प्रकारे स्मरण होणे, त्यांच्या एखाद्या क्षेत्राला जावे असे वाटणे, त्यांच्या नाना लीलांचे अवलोकन होणे, एखाद्या ग्रंथाचे पारायण, वाचन होणे तात्पर्य दत्तगुरूंशी निगडित काहीही होणे ही अनुभूतीच आहे. अहो, मला दत्तगुरू प्रिय आहेत, ही गोष्ट आणि दत्तगुरूंना मी प्रिय आहे ही गोष्ट यात जमीन अस्मानाचा फरक आहे. अनुभूती म्हणजेच दत्त महाराजांना आपण प्रिय होणे आणखी काही नाही.

झाडाचे पान देखील त्यांच्या इच्छे शिवाय हालत नाही. तेव्हा त्यांचे स्मरण होणे म्हणजेच चित्ताला दत्तगुरूंनी दिलेली चालना आहे हे निश्चित. तेव्हा नित्य त्यांच्या कथांचे, लीलांचे स्मरण होणे, वाचन होणे. चिंतन मनन होणे हि सर्व लक्षणे म्हणजे दत्त महाराजांना आपली कायम आठवण असल्याचीच द्योतक आहेत.

एखादी कथा, कादंबरी वाचताना होणारी उल्हसित चित्तवृत्ती गुरुचरित्र वाचनावेळी आळसावते. जांभया येऊ लागतात, डोळे मिटू लागतात. वाचनाची उरलेली पाने किती याचा बुद्धी वेध घेते. जोर जबरदस्तीने केलेली उपासना फलद्रुप का होत नाही, तर चित्त वाचनात नसताना आपण केवळ शब्दांचा वेध घेत असतो.

उपासना अगदी थोडक्यापासून सुरूवात करावी. लीलांच्या कथा वाचा, नामस्मरण करावे, एखाद्या तीर्थक्षेत्री जाऊन यावे, हळूहळू हे सर्व वाढत जाईल, गुरुचरित्र ग्रंथाच्या निदान रोज पाच ओव्या तरी वाचाव्यात आणि मनन कराव्यात. गुरुचरित्राचे नित्य पारायण करा असे कोणी म्हणत नाही. तर किती होते यापेक्षा नेमाने काहीतरी होते याला महत्त्व आहे. यासाठी पुन्हा दत्तगुरुंचीच प्रार्थना करून म्हणायचे, की ‘ हे गुरुदेवा आपले सान्निध्य व साक्षीभाव द्या. जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी केवळ आपले नित्य दर्शन घडू द्या. आपणच आमच्या जीवनाचे सारथ्य करा व आपल्या चरणी निरंतर वास द्या.’ आपले दत्तगुरू कोणालाच काही कमी पडू देत नाहीत. तुमची दु:ख घेऊन तुमची झोळी सुखाने भरतात. फक्त श्रद्धा व भक्ती पाहिजे. अनेक जन्मातील पापांचे क्षय होऊन, पुण्यकर्म फल प्रारंभ झाल्याशिवाय दत्तभक्ती उदित होत नाही. आपल्या मनी एक दृढभाव पाहिजे.

**सर्वकाळ मज गुरु राखितो नाही मज चिंता ॥**
**योगक्षेम तोचि चालवी तोचि मातापिता ॥**
**बंधमोक्ष भ्रांतिहरुनी स्वानंद दाता ॥**



दत्तगुरू आपल्या भक्तांच्या हाकेला ओ देतात कधी रूपात, कधी रूपाशिवाय. त्यांची अनुभूती ही त्यांच्या कृपेवर आणि आपल्या भक्तीवर अवलंबून असते. कोणत्या रूपात ते भेटतील, हे आपण ठरवत नाही पण त्यांचे अस्तित्व आपण मनाने ‘ अनुभवतो ’ त्यालाच अनुभूती म्हणतात.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

# नवग्रहांना प्रसन्न करायचे आहे का?

## करा हे सोपे उपाय; ग्रहदोष होतील दूर, साडेसातीचा होणार नाही त्रास..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक १२ राशींचा एक स्वामी ग्रह असतो. हे स्वामी ग्रह नवग्रहांपैकीच एक असतात. या राशी स्वामींची शुभ किंवा अशुभ स्थिती आपल्या करिअरवर, आत्मसन्मानावर आणि वैवाहिक जीवनावर परिणाम करते. ज्योतिषशास्त्रात नवग्रहांना प्रसन्न करण्यासाठी काही उपाय सांगितले आहेत. हे उपाय करून राशी स्वामींना प्रसन्न करू शकता आणि त्यांची कृपा मिळवू शकता. नवग्रहांना प्रसन्न करण्यासाठी आंघोळीशी संबंधित काही उपायही सांगितले जातात.

**सूर्य देव :**



सूर्य हा सिंह आणि मीन राशींचा स्वामी आहे. या राशीच्या लोकांनी आपल्या राशी स्वामीला प्रसन्न करण्यासाठी रोज आंघोळीच्या पाण्यात वेलची, केशर, लाल चंदन , ज्येष्ठमध किंवा लाल रंगाचे फूल मिसळून स्नान करावे. असे केल्याने सूर्याचे अशुभ परिणाम कुंडलीतून दूर होण्यास मदत होते.

**मंगळ देव :**



मंगळ हा एक क्रूर ग्रह मानला जातो. तो मेष व वृश्चिक राशींचा स्वामी आहे. अनेक लोकांच्या कुंडलीत मंगळाचा प्रभाव असतो. काही लोकांच्या कुंडलीत मंगळ शुभ स्थितीत असतो, तर काहींच्या कुंडलीत अशुभ स्थितीत असतो. मंगळाच्या अशुभ प्रभावापासून वाचण्यासाठी रोज आंघोळीच्या पाण्यात लाल चंदन, जटामांसी, हिंग आणि गुलाबाच्या पाकळ्या मिसळून स्नान करावे. यामुळे मंगळ ग्रह शांत होतो आणि त्याचे अशुभ परिणाम संपतात.

**चंद्र देव :**



चंद्रमा त्याच्या शीतल आणि शांत स्वभावामुळे अत्यंत दयाळू आणि शांत ग्रह म्हणून ओळखला जातो. कुंडलीत चंद्राचा अशुभ प्रभाव असल्यास व्यक्ती रोगांना वेढली जाते. ज्योतिषशास्त्रानुसार चंद्र कर्क राशीचा स्वामी आहे. चंद्राला प्रसन्न करण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात पंचगव्य, पांढरे चंदन, पांढरी फुले, कापूर किंवा गुलाबजल मिसळून स्नान करायला हवे.

**बुध देव :**



बुध हा अत्यंत शांत आणि बुद्धी देणारा ग्रह मानला जातो. राशीचक्रात बुध, कन्या आणि मिथुन राशींचा स्वामी आहे. बुधाच्या वाईट परिणामांपासून मुक्त होण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात गोरोचन, मध, जायफळ किंवा अक्षत मिसळून स्नान करायला हवे. यामुळे त्वचा उजळेलच व तुम्हाला बुधाची कृपाही मिळेल.

**गुरू ग्रह :**



गुरू हा देवांचा आराध्य मानला जातो आणि तो आपल्या सर्वांचे करिअर घडविणारा ग्रह आहे. गुरू बलवान असल्यास व्यक्तीला नाव आणि पैसा दोन्ही मिळतात. गुरू धनू राशीचा स्वामी आहे. गुरूचे शुभ परिणाम मिळविण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात हळद, केशर, पिवळे चंदन आणि झेंडूच्या फुलांच्या पाकळ्या मिसळून स्नान करायला हवे.

**शुक्र ग्रह :**



शुक्राच्या कृपेने आपल्याला भौतिक सुखसोयी, वैवाहिक सुख, प्रेम आणि आकर्षण मिळते. शुक्र राशीचक्रात वृषभ आणि तूळ राशींचा स्वामी आहे. शुक्राची कृपा मिळविण्यासाठी आपल्याला आंघोळीच्या पाण्यात कच्चे दूध, वेलची, चंदन आणि पांढऱ्या फुलांची पाने मिसळून स्नान करायला हवे. यामुळे खूप फायदा होईल.

**शनी देव :**



अनेक लोकांच्या कुंडलीत शनीचा वाईट प्रभाव असतो. अशा लोकांनी रोज शनी स्तोत्राचे पठण करावे आणि आंघोळीनंतर हनुमान चालीसा वाचावी. यासोबतच आंघोळीच्या पाण्यात बडीशेप, काळे तीळ, मोहरीचे काही थेंब किंवा खसखस मिसळून स्नान करायला हवे. शनी मकर आणि कुंभ राशींचा स्वामी आहे. शनीचे उपाय केल्याने या दोन्ही राशींना फायदा होतो.

**राहू ग्रह :**



शनीनंतर राहू हा सर्वांत क्रूर ग्रहांपैकी एक मानला जातो. राहूची वाईट नजर एखाद्यावर पडल्यास व्यक्ती कंगाल होतो. अनेक आजार त्याला घेरतात. राहूच्या अशुभ प्रभावापासून वाचण्यासाठी रोज आंघोळीच्या पाण्यात कस्तुरी, गजदंत, लोबान आणि दुर्वा मिसळून स्नान करायला हवे.

**केतू ग्रह :**



केतूचा अशुभ प्रभाव असल्यास व्यक्तीला सर्वत्र अपयश येते. केतूचा अशुभ प्रभाव दूर करण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात लाल चंदन आणि मोहरीचे दाणे मिसळून स्नान करायला हवे. असे केल्यास केतूचा अशुभ प्रभाव बऱ्याच अंशी कमी होतो.



# धार्मिकता व आध्यात्मिकतेतील फरक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज आपण डोळसपणे आजूबाजूला बघितले तर असे लक्षात येईल की हल्ली साईबाबा, श्री स्वामी समर्थ, गजानन महाराज यांच्या मंदिरांची संख्या वाढते आहे. तसेच सिद्धिविनायक, लालबागचा गणपती यांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या रांगा लागत आहेत. तिरुपतींचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोक तिकडे जात आहेत. मठ व मंदिरांना मोठ्या प्रमाणावर देणग्या मिळत आहेत.

या निरीक्षणावरून, ‘भारतीय समाज धार्मिक होतो आहे,’ असे म्हणता येईल का? जर समाजात धार्मिकता वाढत असेल तर समाजातील वाईट मार्गाने पैसे मिळविण्याची प्रवृत्ती, द्वेष, मारामाऱ्या, बलात्कार यांचे प्रमाण कमी व्हायला पाहिजे; परंतु असे झाल्याचे तर काही दिसून येत नाही. या दोन परस्परविरोधी गोष्टी समाजात एकाचवेळी का आहेत? यासंबंधात खोलात जाऊन विचार केल्यास असे दिसून येईल, की समाजात रुजलेली धार्मिकतेची जी कल्पना आहे तीच मुळात चुकीची आहे. देवळात जाणे, पूजा करणे, पोथ्या वाचणे, पारायणे करणे वगैरे करणारा माणूस ‘ धार्मिक ’ आहे असे जे आपण समजतो हेच मुळात चुकीचे आहे. वरील सर्व गोष्टी माणूस कशाकरिता करतो आहे? त्याचा उद्देश काय आहे? हे तपासणे खूप महत्त्वाचे आहे. या अंगाने तपासणी केल्यास असे दिसून येईल, की माणसे काहीतरी मागण्यासाठी किंवा समस्यांतून सोडवणूक व्हावी म्हणून देवाकडे, संतांकडे जात आहेत. याशिवाय माणसांची अशी एक धारणा/कल्पना असते की देवस्थानांना देणग्या दिल्या, दान केले की आपण केलेल्या पापातून आपली मुक्तता होईल. सर्वसाधारण लोकांना पाप-पुण्याचा हिशेब हा व्यवहारातील ‘ क्रेडीट-डेबीट ’सारखा असतो, असे वाटते. यामुळेच पावणारा देव व संत यांच्याच देवळात गर्दी होते, असे आपल्याला दिसून येईल. सज्जनगडावर दासनवमी सोडून अलोट गर्दी झाली, असे काही दिसत नाही. कारण लोकांना सज्जन होण्यात इंटरेस्ट नसतो. मनाचे श्लोक-ज्यात माणसाने समाजात व वैयक्तिक जीवनात कसे वागावे हे अत्यंत सोप्या भाषेत सांगितले आहे. या श्लोकांचे पारायण करणारा माणूस अगदी अभावानेच आढळतो. या सर्व गोष्टींचा अर्थ एवढाच, की ‘मी सुधारणार नाही परंतु दीनदयाळू देवाने/संतांनी मला मात्र संकटातून सोडवावे व मला पाहिजे ते द्यावे!’ असे न झाल्यास माणूस देवाला दोष देण्यास, धर्माला नावे ठेवण्यास कचरत नाही. असो.

वर म्हटल्याप्रमाणे आपली धार्मिकतेची कल्पना किंवा व्याख्याच चुकीची असेल तर खरी धार्मिकता म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. श्रीमद्भगवद्गीतेत धार्मिक माणसात ५१ गुण असले पाहिजेत, असे सांगितले आहे. या सर्व गुणांचा आढावा या लेखात घेणे शक्य नाही; पण त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी पाहू. वरील ५१ गुणांची सात गटांत विभागणी केली आहे; ती पुढीलप्रमाणे- **१) शम : म्हणजे मनोनिग्रह यात अहिंसा, बळ व सत्तेचा दुरुपयोग न करणे, चोरी न करणे (अस्तेय), न फसविणे (शुचि) वगैरे गुण येतात.२) दम : इंद्रियनिग्रह ३) उपरम : म्हणजे कर्तव्य पालन ४) तितिक्षा : म्हणजे कोणत्याही परिस्थितीत मनाचा तोल जाऊ न देणे, विचलित न होणे.५) श्रद्धा : यात ईश्वरश्रद्धा, कर्मफलश्रद्धा, सगुण उपासना वगैरे गोष्टी येतात. ६) वागणूक वैशिष्ट्य : यात मार्दव, क्षमा, दया, करुणा, दानवृत्ती वगैरे गुण येतात. ७) समाधान : म्हणजे समाधानी वृत्ती.**

वरील सर्व गुण आचरणात आणणे याला धर्माचरण म्हणतात. ‘धर्माचरण जो करतो तो धार्मिक,’ ही धार्मिकतेची खरी व्याख्या आहे. परंतु कर्मकांड म्हणजे धर्माचरण नव्हे ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. खऱ्या धार्मिक माणसांची संख्या समाजात वाढली तर समाज अनेक दृष्टींनी निरोगी होईल व या लेखाच्या सुरूवातीला वर्णन केलेला विरोधाभास नक्कीच कमी होईल. धार्मिक संस्कार म्हणजे माणसाला धर्माचरणाला प्रवृत्त करणे हे होय. स्वतःच्या आचरणातून हे संस्कार पुढील पिढीत पोहोचविले / संक्रमित केले तरच समाज ‘समाज’ म्हणून टिकून राहील. समाजात समाधान व शांतता नांदेल.धर्माचरण ही माणसाची सहज प्रवृत्ती नसल्यामुळे माणूस देहाच्या सुखासाठी निसर्गाचा नाश करतो आहे. या नाशामुळे इतर प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. स्वार्थ व सत्तेची लालसा यांमुळे माणूस निरपराध माणसांना मारण्यास जराही कचरत नाही. तो पशूपेक्षाही हीन पातळी गाठू शकतो. अशावेळी माणसाचे माणूसपण जागे झाले तरच तो धर्माचरणाकडे वळू शकतो.माणसाने विज्ञानाच्या जोरावर मला सगळे कळू शकते असा कितीही आव आणला तरी, ‘हे जग असे का? माझा व जगाचा काय संबंध आहे? मी मरतो म्हणजे काय होते? व शेवटी मी कोण आहे?’ हे मूलभूत प्रश्न कधी ना कधी त्याला पडतात व तो अंतर्मुख होतो. ही अंतर्मुखता ही अध्यात्माची पहिली पायरी आहे. तत्त्वज्ञान येथूनच सुरू होते. म्हणूनच प्लेटो म्हणतो, ‘Philosophy begins in wonder.’ त्यामुळे अंतरंगाचा किंवा आत्म्याचा शोध घेण्याची प्रवृत्ती म्हणजे आध्यात्मिकता! भारतीय तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य असे आहे की ते फक्त सिद्धांत सांगत नाही; तर सिद्धांतात सांगितलेली गोष्ट प्रत्यक्षात अनुभवण्याचा मार्गसुद्धा सांगते. भारतीय तत्त्वज्ञानात आत्मप्रचिती, शास्त्रप्रचिती व गुरुप्रचिती या तिन्ही प्रचिती जेव्हा एकाच निष्कर्षाप्रत येतात तेव्हाच तो अनुभव खरा मानला जातो. यावरून भारतीय तत्त्वज्ञान किती वैज्ञानिक आहे ते लक्षात येईल.

अंतरंगाच्या शोधाचा अंतिम टप्पा म्हणजे आत्मज्ञान किंवा आत्मसाक्षात्कार. माणूस आयुष्यभर सुख, समाधान, आनंद व शांती मिळविण्यासाठी धडपडत असतो. आत्मज्ञान झाले की या सर्व गोष्टी त्याला कायमस्वरूपी मिळतात.धार्मिकता व आध्यात्मिकता या परस्परावलंबी गोष्टी आहेत. मी वाटेल तसे आचरण करीन व आत्मज्ञान मिळवेन असे होऊ शकत नाही; कारण अंतरंगातील प्रवास हा स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाणारा प्रवास आहे. त्यामुळे मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह केल्याशिवाय हा प्रवास होऊ शकत नाही. तुम्ही साधना करू लागलात की तुम्ही स्वतःकडेच तिऱ्हाईत दृष्टीने बघू लागता. त्यामुळे लक्षात येऊ लागते की जे मी माझे एकट्याचे कर्तृत्व म्हणून समजत होतो त्यात अनेक गोष्टींचा सहभाग आहे. त्यामुळे मी कर्ता आहे हा अहंकार कमी होतो. अनेक गोष्टींतील क्षणभंगुरपणा लक्षात यायला लागतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मनात येणारे विचार आपण थांबवू शकत नाही हे कळल्यावर हे विचार का व कोठून येतात याचा शोध घेण्याची जिज्ञासा वाटते. या सर्वांचा परिणाम म्हणून राग, लोभ, मोह इत्यादी षड्रिपू कमी होऊ लागतात व तुमची धार्मिकता सहजपणे वाढते. याचाच अर्थ धार्मिकता व आध्यात्मिकता या एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या गोष्टी असल्या तरी त्यांचे स्वरूप भिन्न आहे. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, केवळ धर्माचरणाने आत्मज्ञान होऊ शकत नाही. म्हणून संत ज्ञानेश्वर हरिपाठात म्हणतात,

**‘विष्णुवीण जप, व्यर्थ त्याचें ज्ञान।**
**रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें।।’** किंवा
**‘तीर्थ, व्रत नेम भावेंविण सिद्धि|**
**वायांचि उपाधी करिसी जना।।’**

आता आत्मज्ञानी व्यक्तीची लक्षणे सांगून लेख संपवितो. आत्मज्ञानी माणूस : १) पूर्णपणे स्वार्थरहित, २) वासना व इच्छारहित, ३) सदैव आनंदी ४) निर्भय, ५) प्रतिभासंपन्न, ६)सर्वांवरती प्रेम करणारा, ७)प्रपंचात अडकलेल्यांबद्दल कणव असणारा असतो. या कणवेतूनच संतवाङ्मय निर्माण होते.

॥ गुरुचरणार्पणमस्तु॥

# धरती का वह पवित्र द्वीप जहां पैदा हुई थी देवताओं की रानी हेरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रीस का सामोस द्वीप अपने महान दार्शनिक पायथागोरस और खगोलशास्त्री अरिस्टार्खस की जन्मभूमि होने के नाते विश्व-प्रसिद्ध है। यह द्वीप सिर्फ विज्ञान और दर्शन का केंद्र ही नहीं था, बल्कि ग्रीक पौराणिक कथाओं में भी इसकी प्रमुख भूमिका रही। माना जाता है कि यही देवी हेरा का जन्मस्थान था और यहीं अर्जुनॉट्स की देवी यात्रा से जुड़े अनेक मिथक भी विकसित हुए।

**समुद्री देवियों की कथा**

प्राचीन रिकॉर्ड बताते हैं कि अर्जुनॉट्स अभियान में शामिल रहे अगैयोस इस द्वीप के पहले बसने वाले थे। कई मिथक यह भी कहते हैं कि समुद्री अप्सराएं, जिन्हें नेरिड्स कहा जाता था, सामोस की पहली निवासी थीं। ये देवियां समुद्र के तूफानों से नाविकों की रक्षा करती थीं और इनमें सबसे प्रसिद्ध एचिलीस की माता ‘थेटिस’ थीं।

**सामोस नाम और भौगोलिक महत्व**

द्वीप का नाम या तो अगैयोस के पुत्र ‘सामोस’ से आया या फीनिशियन शब्द सामा से, जिसका अर्थ है ऊंचे पर्वतों वाला स्थान। यहां के दो विशाल पर्वत, केर्किस और अम्बेलोस हैं, जो आज भी द्वीप के दृश्य को ढंककर रखते हैं। यह क्षेत्र ग्रीस, एशिया और मिस्र को जोड़ने वाले समुद्री मार्गों के केंद्र में होने के कारण अत्यंत रणनीतिक रहा है।

आयोनियन प्रवास और प्रारंभिक समृद्धि लगभग ११०० ईसा पूर्व आयोनियन यूनानी सामोस पहुंचे और अपने साथ हेरा पूजा का चलन भी लाए। ज्यामितीय काल में इस द्वीप ने पूर्व और पश्चिम के व्यापारिक संबंधों के कारण अप्रत्याशित आर्थिक समृद्धि पाई। हालिया पुरातात्विक उत्खननों ने इस प्रारंभिक काल में संस्कृति, व्यापार और सामाजिक विकास के उच्च स्तर का स्पष्ट प्रमाण दिया है।

**सामोस की नौसैनिक शक्ति और एथेंस से संघर्ष**

सामोस के विशाल वनों ने इसे नौसैनिक महाशक्ति बना दिया। ‘ सामैना ’ नामक नई समुद्री जहाज शैली यहीं विकसित हुई। ५ वीं सदी ईसा पूर्व में द्वीप डेलियन लीग में शामिल हुआ, लेकिन इसकी नौसैनिक ताकत से एथेन्स असहज हो गया। आखिरकार ४३९ ईसा पूर्व, नौ महीने की घेराबंदी के बाद एथेंस ने सामोस पर कठोर शर्तों के साथ कब्ज़ा कर लिया। कलात्मक विरासत और पॉलीक्रेटीस का

**स्वर्ण युग**

आर्काइक काल में, खासकर तानाशाह पॉलीक्रेटीस के शासन में, सामोस अपने चरम पर पहुंचा। इसी युग में ऐतिहासिक यूफालिनोस सुरंग, द्विमुखी जलवाहिनी का निर्माण हुआ, जिसे हेरोडोटस ने दुनिया का सबसे महान मंदिर और इंजीनियरिंग चमत्कार बताया। यही वह काल था जब सामोस एक सांस्कृतिक केंद्र बन चुका था और पायथागोरस जैसे महान चिंतक यहीं जन्मे।

**हेलीनीस्टिक युग और सामोस का राजनीतिक उतार-चढ़ाव**

चौथी सदी में सामोस कभी स्पार्टा तो कभी एथेंस के प्रभाव में रहा। ३६५ ईसा पूर्व में एथेनियनों ने स्थानीय लोगों को निर्वासित कर दिया, लेकिन सिकंदर महान की मृत्यु के बाद ३२२ ईसा पूर्व में सामियन नागरिक फिर से लौटे। इसके बाद यह द्वीप विभिन्न साम्राज्यों, प्टोलमी, पर्गामोन और दूसरे शासकों के प्रभाव में आता-जाता रहा। रोमन युग, क्लियोपाट्रा और सम्राटों का आश्रय १२९ ईसा पूर्व से सामोस रोमन एशिया प्रांत का हिस्सा बन गया। ४०-३९ ईसा पूर्व एंटनी और क्लियोपाट्रा ने सर्दियां यहीं अपने भव्य विला में बिताईं। बाद में सम्राट ऑगस्टस, ट्राजन, टिबेरियस और हेड्रियन भी यहां रहने लगे। सामोस रोमन कुलीनों का विलासी अवकाश स्थल बन चुका था, जिसके शानदार प्रमाण आज भी पायथागोरियो के संग्रहालय में देखे जा सकते हैं।

आधुनिक उत्खनन और प्राचीन शहर का पुनर्जन्म १९०२ से शुरू हुए पुरातात्विक उत्खननों ने सामोस के गौरवशाली इतिहास को नए रूप में उजागर किया। हाल के दशकों में मिले अवशेषों से पता चलता है कि यह एक संगठित और समृद्ध नगर था, सड़कों, अगोरा, स्नानगृहों, जलस्रोतों, जिम्नेजियम, थिएटर और मंदिर भी यहां मौजूद थे। अनेक सभ्यताओं के प्रभाव ने सामोस को ग्रीक

